# दोस्ती कुणाची? कुस्ती कुणाशी?

भवति-न-भवति करीत अखेर महापालिका निवडणुकांवरील अनिश्चिततेचे सावट दूर झाले आहे. राज्यातील सर्व २९ महापालिकांच्या रणधुमाळीचा बिगुल वाजला आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतील पहिल्या टप्प्याचा म्हणजे २८८ नगरपालिका-नगरपंचायतींचा निकाल लागल्यानंतर पुढच्या मंगळवारी महापालिकांच्या दुसऱ्या टप्प्याची प्रक्रिया सुरू होईल. जवळपास साडेतीन कोटी मतदार नव्या वर्षात १५ जानेवारीला २ हजार ८६९ नगरसेवक निवडून देण्यासाठी मतदान करतील. १६ जानेवारीला जनमताचा कौल स्पष्ट होईल.●देशाची आर्थिक राजधानी मुंबई, शेजारचे ठाणे, आर्थिक व औद्योगिक प्रभाव असलेले पुणे व पिंपरी-चिंचवड तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय व दीक्षाभूमी असलेले नागपूर या मोठ्या महापालिकांमध्ये कोणाला कौल मिळतो याकडे संपूर्ण देशाचे लक्ष असेल आणि नाशिक, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या इतर महत्त्वाच्या शहरांकडेही सर्वांचे लक्ष असेल. सामान्य कार्यकर्त्यांचे जाळे ते मतदार याद्या अशा सर्वच बाबतीत महापालिका निवडणूक ही राजकीय पक्षांसाठी मोठी कसोटी असेल. विशेषतः विधानसभा निवडणुकीतील ऐतिहासिक यश केवळ योगायोग नव्हता, फ्लूक नव्हते हे दाखवून देण्यासाठी भारतीय जनता पक्ष तसेच शिंदे सेना व अजित पवारांची राष्ट्रवादी या महायुतीमधील घटकपक्ष कंबर कसून मैदानात उतरतील. मुंबई वगळता या प्रमुख महापालिकांमध्ये सध्या तरी राज्यातील सत्ताधारी महायुतीपुढे विरोधी पक्षांचे आव्हान मोठे नाही. त्यामुळेच बहुतेक ठिकाणी विरोधकांची जागा बळकावण्यासाठी महायुतीमधील घटकपक्षच एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढतील, असे दिसते. पुणे व ठाणे ही अशा मैत्रीपूर्ण लढतीची ठळक उदाहरणे म्हणता येतील. नागपूरमध्ये भाजप स्वबळावर लढून सलग चौथ्यांदा महापालिका जिंकण्याचा प्रयत्न करील. उद्धव व राज हे ठाकरे बंधू एकत्र आल्यामुळे मुंबईत मात्र महायुतीला एकजूट होऊन लढण्याशिवाय पर्याय नाही. मुंबई ही केवळ देशाची आर्थिक राजधानीच आहे असे नाही. देशातील अनेक छोट्या राज्यांपेक्षा मोठे बजेट असणारी ही धनवान महापालिका आहे. म्हणून ती ताब्यात ठेवण्याचा सगळेच प्रयत्न करतील. शिवसेनेच्या फुटीनंतर भाजप व उद्धवसेनेमध्ये निर्माण झालेली कटुता, संकटसमयी ठाकरे बंधूंनी एकत्र यावे म्हणून उभा राहिलेला कार्यकर्ते व जनतेचा रेटा, ठाकरे घराण्याची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी भिडलेले एकनाथ शिंदे, त्यांना नारायण राणे व पूर्वाश्रमीच्या शिवसेना नेत्यांची साथ आणि या सगळ्यातून राजकीय लाभ-हानीचे डावपेच लढविणारा भाजप अशा रंजक वळणावर मुंबईचा महासंग्राम पोहोचला आहे. मराठी माणसांसाठी आम्ही लढत आहोत, असे ठाकरे बंधू व त्यांचे पक्ष म्हणत असले तरी केवळ मराठी मतांवर मुंबई जिंकणे शक्य नाही. अशावेळी अन्य भाषिक तसेच इतर मतदारांना ते आपल्याकडे कसे वळवितात हे पाहणे महत्त्वाचे असेल. काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी या अन्य विरोधी पक्षांची ताकद सध्या दिसत नसली तरी मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर अशा बहुतेक सर्व शहरांमध्ये काँग्रेस तर पुणे व अन्य काही ठिकाणी शरद पवारांच्या राष्ट्रवादी जिवंत आहे. लोकसभा निवडणुकीत या पक्षांना चांगले यश मिळाले. आता महापालिका निवडणुकीत ती ताकद कसे दाखवून देतात हे पाहावे लागेल. असो. या निवडणुका प्रदीर्घ प्रशासकीय राजवटीच्या पार्श्वभूमीवर होत आहेत. काही शहरांमध्ये पाच वर्षांपासून, तर बहुतेक ठिकाणी तीन-साडेतीन-चार वर्षांपासून संपूर्ण प्रशासन, कारभार प्रशासकांच्या म्हणजे अधिकाऱ्यांच्या हातात आहे. आता या निवडणुकांनंतर लोकनियुक्त नगरसेवक सभागृहात असतील. विविध समित्या, विशेषतः खजिन्याची चावी म्हणविली जाणारी स्थायी समिती स्थापन होईल. महापौरपद मानाचे तर स्थायी सभापतिपद कामाचे. म्हणून दोन्ही पदे आपल्या ताब्यात असावीत यासाठी स्पर्धा असेल. तत्पूर्वी, नगरसेवकांच्या निवडीत खरा कस लागेल तो नागरिकांचा. वाहतूक कोंडी, हवेचे आणि पाण्याचे प्रदूषण, कचरा व्यवस्थापन ही प्रमुख आव्हाने सगळ्याच शहरात आहेत. मुंबई, पुणे, ठाण्यात तर ती अधिकच कठीण आहेत. ती पेलणारी, समस्या सोडविणारी, राहणे आणि जगणे सुखकर बनविणारी नगरसेवकांची टीम निवडून देणे हे नागरिकांपुढील प्रमुख आव्हान आहे. राजकीय थिल्लरपणा, आरोप-प्रत्यारोप, हडेलहप्पी यापलीकडे जाऊन विचार करण्याची, वॉर्डा-वॉर्डातून कामाची माणसे निवडून देण्याची आणि त्यांच्या माध्यमातून नागरी प्रश्न सोडवून घेण्याची हीच वेळ आहे.

# जीपीएस 'ट्रॅक'द्वारे पोलीस कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचे नियंत्रण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलिस कर्मचारी दिलेला बंदोबस्त किंवा सोपवलेली जबाबदारी चोख निभावतात की नाही हे यापुढे जीपीएस 'ट्रॅक'द्वारे वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्वरित कळणार आहे. बंदोबस्ताचे ठिकाण सोडून इतरत्र थांबण्याचे प्रकार टाळण्यासह बंदोबस्तामुळे गुन्हेगारी नियंत्रणात येते का? हेही या माध्यमातून पडताळले जाणार आहे. यासाठी नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाने प्रायोगिक तत्त्वावर उपक्रम हाती घेतला असून, महिन्याभरात तो पूर्ण ताकदीने राबवला जाणार आहे.

पनवेल परिसराचा होणाऱ्या विकासाच्या तुलनेत पोलिसांकडे अपुरे मनुष्यबळ आहे. परिणामी गुन्हेगारांचा शोध घेणे, रोजचे बंदोबस्त यांचे नियोजन करताना अधिकाऱ्यांना झळ बसते. त्यातच काही कर्मचारी दिलेला बंदोबस्त चोखरित्या न बजावता भलत्याच ठिकाणी बसलेले असतात. याचा परिणाम गुन्हेगारी नियंत्रणात आणण्याच्या कामावरही होतो. रस्त्यावर पोलिस दिसले तरीही अनेकदा गुन्हेगारी कृत्याला आळा बसतो. हीच परिस्थिती वाहतूक पोलिसांच्या बाबतीतदेखील आहे. अनेकदा गुन्हेगारांच्या मागावर राज्यभरात किंवा राज्याबाहेर असलेल्या पोलिसांच्या सुरक्षेचाही प्रश्न गंभीर असतो. ते नेमके कोणत्या ठिकाणी व कोणत्या अवस्थेत आहेत याचीही क्षणाक्षणाची माहिती थेट पोलिस आयुक्तालयात नोंद होणार आहे. सध्या प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबवला जात असून, त्यात समोर येणाऱ्या बाबी पडताळल्या जात आहेत.

याशिवाय महिन्याभरात पूर्ण ताकदीने हा उपक्रम राबवला जाणार आहे . अनेकदा बंदोबस्तावर नेमलेले पोलिस परस्पर गैरहजर राहण्याचे प्रकार घडत असतात. यामुळे कागदोपत्री नेमलेल्या बंदोबस्ताच्या ठिकाणी प्रत्यक्षात कोणीच हजर नसते किंवा निश्चित केलेल्या जागेऐवजी वेगळ्याच ठिकाणी कर्मचारी भलतेच कर्तव्य बजावत असतात. ट्रॅकमुळे वरिष्ठांना अपडेट समजणार असल्याने कामचुकारांना आळा बसणार आहे.

गुन्हेगारी नियंत्रणासाठी नाकाबंदीचा केली जाते. मात्र, एक मार्ग बंद झाला तरीही इतर मार्गांनी गुन्हेगार निसटू शकतात. अशा वेळी नाकाबंदीच्या नियोजनाचीही जुळवाजुळव जीपीएस ट्रॅकिंगच्या माध्यमातून होऊ शकते. त्यात कोणत्या ठिकाणी किती कर्मचारी हजर आहेत, हे तपासले जाणार आहे. तसेच यामुळे वाहतूक कोंडी प्रश्न सुद्धा निकाली निघणार आहेत .



# नेरळच्या शार्विल स्कूलमध्ये कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शन संपन्न



**दै.रायगड नगरी । माथेरान**

कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शन आज दि.१७ रोजी शार्वील स्कुल नेरळ येथे संपन्न झाले. सदर कार्यक्रमात तालुकास्तरीय शैक्षणिक नवोपक्रम पुस्तिका महेंद्र थोरवे आमदार कर्जत खालापूर मतदारसंघ, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, अनंत खैरे गटशिक्षणाधिकारी पं. स.कर्जत, परब मॅडम गटशिक्षणाधिकारी खालापूर यांच्या उपस्थितीत प्रकाशन संपन्न झाले.

सदर पुस्तकेसाठी तालुक्यातील सर्व उपक्रमशील शिक्षक, तंत्र स्नेही शिक्षक, सर्व केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, समूह साधन केंद्र अधिकारी वर्ग यांनी विशेष सहभाग,योगदान व सहकार्य केले त्याबद्दल विस्तार अधिकारी नारायण सोनवणे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने माझा नवोपक्रम विद्यार्थी स्वयंपूर्णते कडे या अनुषंगाने विद्यार्थी, शाळा,तालुका एकूण गुणवत्ता विकासामध्ये योगदान देण्याकरिता सदर संकल्पना पूर्ती केली. सदर पुस्तिकेची माहिती झऊक्ष स्वरूपात सर्व शिक्षकांना देण्याचा मानस श्री.सोनवणे यांनी व्यक्त केला. उपस्थित मान्यवरांनी तालुक्याच्या या अभिनव संकल्पनेचे स्वागत व कौतुक केले.

विज्ञान प्रदर्शनात २०० पेक्षा अधिक विज्ञान प्रतिकृती सादर करण्यात आल्या आहेत.शिवाय मान्यवर,पाहुण्यांनी ,शिक्षकांनी सदर प्रतिकृतीचे निरीक्षण करून अभिनंदन केले.बहुसंख्य शिक्षकांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना प्रदर्शनात सहभागी करून विद्यार्थ्यांना आनंद द्विगुणित केला.

# पॉवरलिफ्टर गणेश पुष्पा संजय तोटेचे उत्स्फूर्त स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तुर्की येथे आशियाई पॉवरलिफ्टिंग इक्विप्ड स्पर्धा नुकतीच पार पडली.या स्पर्धेत रायगड - महाराष्ट्राचा खेळाडू गणेश पुष्पा संजय तोटे हा खेळाडू १०५किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत कांस्य पदकाचा मानकरी झाला. पनवेल भिंगरी येथील रहिवासी असलेला आणि पुणे सासवड येथील वाघेरे महाविद्यालयाचा विद्यार्थी असलेला,वडिलांचे निधन झाल्यानंतर तीन दिवसांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेला रवाना होऊन पदक प्राप्त करून वडिलांना श्रद्धांजलीच दिली. एकूण ८१७.५ एवढे वजन स्कॉट, बेंचप्रेस, डेडलिफ्ट या प्रकारात गणेशाने उचलले. त्यामुळे त्याला स्कॉट मध्ये रौप्य पदक, बेंचप्रेस कांस्य सर्व स्पर्धकात कांस्य अशी एकूण तीन पदक प्राप्त झाले. त्याने त्याच्या यशाचे श्रेय प्रशिक्षक विशाल मुळे आणि जिम संचालक प्रमोद पवार यांना दिले आहे. त्याचबरोबर पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडच्या समस्त कार्यकारिणीने सुद्धा स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या होत्या.तसेच स्पर्धेच्या दिवशी आंतरराष्ट्रीय पंच, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त, राज्य संघटनेचे सचिव संजय प्रतापराव सरदेसाई यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले याबाबत त्याने कृतज्ञता व्यक्त केली. गणेशच्या पदक प्राप्तीमुळे पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे कार्यकारणी सदस्य संदीप कृष्णा पाटकर आणि सुभाष दगडू टेंबे यांनी त्याच्या घरी जाऊन आई पुष्पा संजय तोटे, बहिण पल्लवी, भाऊ आकाश आणि आत्या संगीता पांदे यांच्या उपस्थितीत त्याला भेटवस्तू गुच्छ देऊन गौरविले. संघटनेच्या या उपक्रमाबद्दल गणेश तोटे यांनी समाधान व्यक्त केल आहे.

# दिव्यांग-वृध्दांचा त्रास वाचविण्यासाठी पोलादपूरचे सेतू केंद्र आता जमिनीवर

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर ।** तालुक्यातील दिव्यांग आणि वृध्दांसह महिलांनादेखील तहसिल कार्यालयाच्या वरच्या मजल्यावर असलेल्या सेतू केंद्रात जाण्यासाठी धक्का नसलेल्या जिना चढून जा-ये करण्याचा त्रास कमी करण्यासाठी तहसिलदार कपिल घोरपडे यांनी सेतू केंद्र आता जमिनीवर आणले आहे. सोमवारपासून या सेतू केंद्रामध्ये कामकाजाला सुरूवात करण्यात आल्याची माहिती संचालक श्रीकांत मालुसरे यांनी दिली.

पोलादपूर तहसिल कार्यालयामधील सेतू केंद्रामध्ये जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, अल्पभूधारक दाखला, नॉन-क्रिमिलेअर, शेतकरी प्रमाणपत्र, संजय गांधी निराधार योजना दाखला इत्यादींसाठी अर्ज करण्यासाठी तसेच विविध शासकीय परवाने मिळवण्यासाठी ऑनलाइन अर्ज भरणे, टोकन सिस्टीम, रिअल-टाइम स्टेटस तपासणे आणि अर्जदाराचा वेळ वाचवण्यासह सरकारी कार्यालयांमध्ये होणारी गर्दी आणि गैरसोय टाळणे तसेच आवश्यक सेवा घराच्या जवळ उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे सुरू करण्यात आलेल्या पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील आबालवृध्द महिला पुरूष ग्रामस्थ येत असतात.

मात्र, गेल्या चार पाच वर्षांपासून पोलादपूर तालुक्यातील सेतू सेवा केंद्र तहसिल कार्यालयाच्या वरील मजल्यावर असल्याने शारिरीक त्रास असलेल्या नागरिकांना अवघड तसेच सुलभ नसल्याने गैरसोय वाटत असल्याचे दिसून आले. यामुळे पोलादपूरचे तहसिलदार कपिल घोरपडे यांनी जुन्या ब्रिटीशकालीन तहसिल कार्यालयाच्या बेसमेंटवर पत्राशेडमध्ये सेतू केंद्र सुरू करण्यासाठी आकर्षक पत्राशेड उभारून सेतू सेवा केंद्राचे संचालक श्रीकांत मालुसरे यांना कामकाज जमिनीवर सुरू केल्यास नागरिकांची गैरसोय टाळणे शक्य होणार असल्याचे सुचविले. त्यानुसार सोमवार दि. १५ डिसेंबर २०२५ पासून महाराष्ट्र शासनाचे सेतू सेवा केंद्र नव्या पत्राशेडमध्ये सुरू करण्यात आले आहे. अशी माहिती संचालक श्रीकांत मालुसरे यांनी दिली.



# शेतकऱ्यांचे नेते पंकज तांबेंची किसान प्रदर्शनास भेट

**दै.रायगड नगरी । संतोष सुतार**

**माणगाव ।** पुणे जिल्ह्यातील मोशी येथे सुरू असलेले भारतातील सर्वात मोठे किसान प्रदर्शन हे केवळ एक प्रदर्शन न राहता शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरत आहे. दिनांक १० डिसेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत भरविण्यात आलेल्या या भव्य कृषी प्रदर्शनात पारंपारिक शेतीकडून आधुनिक, शाश्वत आणि उत्पन्नवाढीच्या शेतीकडे वाटचाल करण्याचा अचूक मार्ग शेतकऱ्यांना दाखविण्यात येत आहे.

या प्रदर्शनाला माणगाव येथील स्वराज्य संघटनेचे संस्थापक व शेतकरी नेते पंकज तांबे यांनी प्रत्यक्ष भेट देत आधुनिक शेतीतील नवनवीन तंत्रज्ञान, उपकरणे व प्रयोगांची सखोल माहिती घेतली. शेतकऱ्यांच्या हितासाठी उपयोगी ठरणाऱ्या नवकल्पना, यंत्रसामग्री आणि संशोधनाधारित शेती पद्धती यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला. या किसान प्रदर्शनात शेतकऱ्यांना लागणारी आधुनिक शेती अवजारे, यांत्रिकीकरणासाठी आवश्यक उपकरणे, ड्रिप व स्प्रिंकलर सिंचन प्रणाली, पाणी व्यवस्थापनासाठी विविध प्रकारचे पंप व साधने, तसेच माती परीक्षणाच्या आधुनिक पद्धती यांची सविस्तर माहिती देण्यात येत आहे. उत्पादन खर्च कमी करून नफा वाढवण्यासाठी कोणती साधने आणि तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकतात, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन येथे मिळत आहे.

शेतीपूरक उद्योगांमध्ये रस असणाऱ्या तरुण-तरुणींना छोट्या उद्योगापासून मोठ्या उद्योगांपर्यंत लागणाऱ्या आधुनिक मशिनरी, नव्या तंत्रज्ञानातून विकसित करण्यात आलेली यंत्रसामग्री प्रत्यक्ष पाहण्याची व समजून घेण्याची संधी या प्रदर्शनातून मिळत आहे. कृषी उद्योजकतेकडे वळू इच्छिणाऱ्या युवकांसाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरत आहे.

या प्रदर्शनात कृषिविषयक बी-बियाणे, रोपे, ऊस वाटिका, तसेच विविध पिकांसाठी उपयुक्त असणाऱ्या सुधारित जाती शेतकऱ्यांना पाहायला मिळत आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात नवे प्रयोग करावेत, पीक पद्धतीत बदल घडवावा आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करावी, यावर या प्रदर्शनात विशेष भर देण्यात आला आहे. याशिवाय गांडूळ खत निर्मिती, शेततळ्यासाठी आवश्यक ताडपत्री, आधुनिक प्लास्टिक कल्चर, संरक्षित शेती (ग्रीन हाऊस, शेडनेट) यांचा शेतीमध्ये कसा प्रभावी उपयोग करता येतो, याची सखोल माहिती तज्ज्ञांच्या माध्यमातून दिली जात आहे. सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे, सोलार कीटकनाशक फवारणी यंत्रणा, सूर्यफूल लागवडीच्या सुधारित पद्धती, अशा अनेक उपयुक्त विषयांवर मार्गदर्शन करण्यात येत आहे. एकूणच, मोशी येथील हे किसान प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी ज्ञान, तंत्रज्ञान आणि नवसंकल्पनांचा संगम ठरत असून, बदलत्या काळानुसार शेतीत आधुनिकता स्वीकारण्यासाठी एक भक्कम व्यासपीठ निर्माण करत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीबरोबरच शेतीला उद्योगाचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने हे प्रदर्शन निश्चितच मैलाचा दगड ठरत असल्याचे चित्र येथे पाहायला मिळत आहे.




सिडको शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **वाटपपत्र / करारनामा** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे १९२९ | न्हावे १/९४/३ | २अ/८८ | ०-८४-० | ७५० | उलवे नोड येथील भूखंड क्र.४५, सेक्टर-१५A, क्षेत्र-७४९.९२ चौ.मी. | कै. चांगुनाबाई काथोर ठाकूर (मयत) यांचे वारस श्री. अनंता काथोर ठाकूर | -- |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :-** मुख्य भूमी व भूमापन अधिकारी,
सिडको भवन, तळ मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/४५१/२०२५-२६



## PUBLIC NOTICE

All concerned are hereby informed that my name is Vanita Purushottam Landge, and in the military service document (Seat Roll / Service Record) of my husband Purushottam Shankarrao Landge (Army), my name has been recorded only as "Vanita."

Further, in the said records my date of birth is mentioned as 15/08/1976, whereas my true and correct date of birth is 29/05/1976, as per my Aadhaar Card and PAN Card.

The names "Vanita" and "Vanita Purushottam Landge" pertain to one and the same person, and in this regard I have executed an Affidavit.

If any person has any objection to this notice, the same should be communicated in writing to the address mentioned below within 15 days from the date of publication of this notice. Failing which, it shall be presumed that there is no objection.

Date: 17/12/2025
Place: Panvel



## Public Notice for Name Correction / Clarification

I, Purushottam Shankar Landge, Age: 57 years, Occupation: Army Services, Residing at Flat No. C-402, Shree Sai Sadan CHS, Plot No. A-1, Sector-07, Khanda Colony, New Panvel, Taluka Panvel, District Raigad, Maharashtra, hereby inform all concerned that my son's name has been mistakenly recorded only as "Harshal" in the Army Service Documents / Sheet Roll / NOK Record.

The full and correct name of my son is "Harshal Purushottam Landge", as mentioned in his Aadhaar Card, PAN Card, and School Leaving Certificate.

It is hereby clarified that "Harshal" and "Harshal Purushottam Landge" refer to one and the same person, and there is no change in identity. This notice is issued for making the necessary correction / clarification entry accordingly.

If anyone has any objection, they should communicate the same in writing within 7 (seven) days from the date of publication of this notice at the address mentioned below. Failing which, it shall be presumed that there is no objection.

Date: 17/12/2025
Place: Panvel


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# एलपीजी गॅसच्या अवजड सिलेंडर पासून रायगडच्या गृहिणींची मुक्ती

**दै.रायगड नगरी । पेण**

घरगुती एलपीजी सिलेंडर संपल्यानंतर नवीन सिलेंडर येईपर्यंत वाट पाहावी लागते. घरातील गृहिणींना वजनाला जड असलेला सिलेंडर हाताळणे कठीण जाते. परंतु आत्ता रायगड जिल्ह्यातील महिलांना स्वयंपाक बनविण्याकरिता एलपीजी सिलेंडरच्या कटकटीतून मुक्ती मिळत आहे. रायगड जिल्ह्यात महानगर गॅस लिमिटेडच्या माध्यमातून घरोघरी पाईपलाईन द्वारे गॅस सप्लाय करण्यात येत आहे. यामुळे महिलांना एलपीजी गॅस सिलेंडरच्या कटकटीतून मुक्ती मिळत आहे. रायगड जिल्ह्यातील १ लाख २ हजार ३८१ घरघुती ग्राहक या सेवेचा अविरतपणे लाभ घेत आहेत व हि समाधानी ग्राहकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे अशी माहिती महानगर गॅसचे उपाध्यक्ष गुरविंदर सिंग यांनी हॉटेल राजे शिवराय पेण येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

महानगर गॅस पाईपलाईन द्वारे पोहोचवण्याची सेवा रायगड जिल्ह्यातील रसायनी, खालापूर, खोपोली, उरण येथे सुरू असून माणगाव, पेण आणि अलिबाग येथे पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. २०२६ मध्ये हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या शहरांमध्ये अंशतः सेवा सुरू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनेक प्रमुख शहरांमध्ये स्थानके कार्यान्वित करण्यात आली आहेत. लवकरच श्रीवर्धन, तळा आणि मुरुड येथे सीएनजी स्थानके उभारली जाणार आहेत. येत्याकाळात जिल्ह्यातील रोहा, महाड आणि पोलादपूर येथेही या सेवेचा विस्तार करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात ६८ सीएनजी स्थानके उभारण्यात आली आहोत. जिल्ह्यातील ४८ औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना सेवा पुरविण्यात येत आहे. पेण शहरात आजपर्यंत सुमारे ६ हजार घरांमध्ये गॅस जोडणी करण्यात आली आहे. परंतु त्यापैकी ४ हजार ५०० घरांमध्ये प्रत्यक्ष गॅसचा पुरवठा सुरू झालेला आहे अशी माहिती महानगर गॅस कंपनीचे सहाय्यक प्रकल्प उपाध्यक्ष विवेक सोनार यांनी पत्रकारांना दिली.

यावेळी पेणमध्ये सुरु असलेल्या गॅस पाईपलाईनच्या कामामध्ये असलेल्या त्रुटी पेणमधील पत्रकारांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या या त्रुटी लवकर लवकर सोडविण्याचे आश्वासन यावेळी देण्यात दिले. या पत्रकार परिषदेला महानगर गॅस लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ उपाध्यक्ष (प्रकल्प ) गुरविंदर सिंग, उपाध्यक्ष (ऑपरेशन्स आणि मेंटेनन्स) सितांशु रॉयचौधरी, महाव्यवस्थापक ऑपरेशन्स आणि मेंटेनन्स प्रताप आयरेकर, सहाय्यक उपाध्यक्ष विवेक सोनार, नंदेश पाटील आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आठ लाख ४० हजारांचे दागिन्यांची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल एसटी स्टँड परिसरात चार चाकी कार मध्ये बसले असताना अज्ञात इसमाने ८ लाख ४० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

कृष्णा रामा ठाकूर हे विचुंबे येथे राहत असून पत्नीसह चिंचोटी, अलिबाग येथे नातेवाईकांचे लग्न असल्याने जाण्यासाठी ते पत्नीचे दागिने सोबत घेऊन त्यांनी कपड्याच्या बॅगमध्ये ठेवले होते. ते पनवेल बस स्टॅन्ड येथे आले. यावेळी ते स्टॅन्ड समोर अलिबाग येथे जाणाऱ्या खाजगी गाडी कडे आले. यावेळी पांढऱ्या रंगाच्या एर्टिगा कार चालकाने अलिबाग येथे जाणार असल्याचे सांगितले ते त्या गाडीत बसले.

मात्र प्रवासी नसल्याने उशीर होईल असे सांगितल्याने बॅग डिकीत ठेवा असे चालकाने सांगितले. त्यांनी बॅगा डिकीत ठेवल्या. ते कारच्या सीटवर बसले. यावेळी मागच्या सीटवर एक जोडपे बसले होते. ते अलिबागच्या दिशेने निघाले. त्यांच्यासोबतची महिला कारले खिंड येथे उतरली. त्यानंतर ठाकूर आणि त्यांची पत्नी अलिबाग येथे उतरून रिक्षा पकडून राहत्या घरी चिंचोटी येथे पोहोचले. घरी पोहोचल्यावर बॅगेमध्ये ठेवलेले दागिने पाहिले असता दागिने सापडून आले नाहीत. सर्व बॅगेत दागिने शोधले मात्र सापडले नाहीत. कार मध्ये बसल्यानंतर अज्ञाताने दागिने चोरले अशी तक्रार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे बेलवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक श्री. काशिनाथ झिपरु चोरघे, श्री. आंबो झिपरु चोरघे, श्रीमती. राजूबाई गणा म्हात्रे आणि श्रीमती. रेवूबाई जनार्दन पवार यांचे हिश्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडुन कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापुर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरीता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन : मौजे बेलवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| खाते क्रमांक | भुधारण पद्धती | सर्व्हे नं./ गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| २७८ | २ | २०७ | २ | १.००.२० |

तरी वर नमुद जमीनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षीस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करुन कागदोपत्री पुराव्यासहित खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक श्री. काशिनाथ झिपरु चोरघे, श्री. आंबो झिपरु चोरघे, श्रीमती. राजूबाई गणा म्हात्रे आणि श्रीमती. रेवूबाई जनार्दन पवार यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहित असल्याबाबत गृहित धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमीनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडुन दिल्या आहेत. असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/१२/२०२५

सही/-
**श्री. विशाल कोंडिबा व्हनमाने**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं. १२०१, वि-टाइम्स स्क्वेअर,**
**भूखंड क्रं. ३, सेक्टर नं. १५,**
**सीबीडी बेलापूर, नवी मुंबई. ४००६१४**
**मो. नं. ८२८६६५१७४७**

मा.गणवीर मॅडम कोर्ट

**PUBLIC NOTICE FOR HEIRSHIP CERTIFICATE**
**IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE (S.D) PANVEL**

**Civil M.A. No.: 1430/2025**
**Exh No.8/D**
**N.D. 13/01/2025**

Whereas LATE SMT RENU DASH, Indian Inhabitant, died intestate on 26/06/2025 at Apollo Hospitals B G Road, Banglore, BBMP, Bengaluru Urban, Karnataka WHEREAS Mr. Narayan Dash, Ms. Shweta Dash and Mr. Sagar Dash all residing at Flat No-701/702, 7th Floor, Mangium Wing M-1, Adhiraj Garden Chsl, Plot No. 32, Sector 5. Kharghar, Navi Mumbai, Tal. Panvel, Dist. Raigad, Maharashtra-410210, application for Heirship Certificate of Legal Heirs to The Court Of Hon'ble S.D. Panvel At Panvel for the purpose of faithfully administer the Legal Heir of the said deceased and in any way connecting this.

**SCHEDULE OF PROPERTY**

LATE SMT RENU DASH (50% Share)

FLAT NO-701/702, 7TH FLOOR, WING M-1, MANGIUM, ADHIRAJ GARDEN CHSL, PLOT NO. 32, SECTOR 5, KHARGHAR, NAVI MUMBAI, TAL. PANVEL, DIST. RAIGAD, MAHARASHTRA-410210

Admeasuring Area 74.61 Sq. Mtr. Agreement ValueRs. 1,09,00,000/-(Rupees One Crore Nine Lakh Only)

This is to give notice to all person who may have objection to this Heirship Certificate Application may appear in The Court Of Hon'ble S.D. Panvel At Panvel within one month from the date of this Public notice, there to entire their objections, and it is hereby declared that if no sufficient objection is offered before the expiration of that period, the Judge Of The Hon'ble Court S.D. Panvel At Panvel will forthwith proceed to receive proof if the Mr. Narayan Dash, Ms. Shweta Dash and Mr. Sagar Dash right, and to grant him provided he shall appear to entitle thereto, a certificate of Heirship Certificate of the said deceased LATE SMT.RENU DASH.

Date : 17/12/2025

**sd/-**
**Jr.Clerk**
**Civil Court S.D. Panvel**

Court Seal

**sd/-**
**Asst.Supted.**
**Civil Court S.D. Panvel**

## जाहीर नोटीस

उरण येथील मे दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३२७/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०१/२०२६

लता काशीनाथ बंडा व इतर — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्धारे असे कळविण्यात येते की, कै. जनाबाई एकनाथ जोशी हया दि. २३.०३.२०१९ मौजे कोटनाका ता. उरण, जि. रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मयत झाल्या आहेत. कै. जनाबाई एकनाथ जोशी यांच्या आई कै. नर्मदा नारायण भोईर यांचे दि.०३.०१.२००२ रोजी त्यांच्या राहत्या घरी मौजे काळाधोंडा, चाणजे, उरण, रायगड येथे मयत झाल्या आहेत. कै. जनाबाई एकनाथ जोशी यांचे पती कै. एकनाथ कमल्या जोशी यांचे दि.१९.०९.२०२१ रोजी लिलावती हॉस्पीटल ॲण्ड रिर्सच सेंटर, वांद्रा (वेस्ट), मुंबई येथे मयत झाले आहेत अर्जदार क्र १) सौ. लता काशिनाथ बंडा रा. गोखले पार्क, चिंचवड गावं, पुणे २) श्री. राजेंद्र एकनाथ जोशी रा. कोटनाका, ता. उरण, जि. रायगड ३) सौ मनोरमा मधुकर सुरते रा. कामोठे, कळंबोली नोड, पनवेल, जि रायगड.

**मिळकतीचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| बोरीपाखाडी १/९०/१७ | १८६ | ६ | ०-१४-२० |
| | १८७ | ३ | ०-७८-१० |

सबब वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार व हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वःत अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी .

उरण
दिनांक : १२/१२/२०२५

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

राठोड साहेब यांचे कोर्टात

प्रो.जमा ५० रु. — अर्जदारांतर्फे वकील
ॲड.स्वाती भरत गायकर

## जाहीर नोटीस

पनवेल येथिल मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर पनवेल
यांचे न्यायालयात - पनवेल, रायगड
दि.चौ.अर्ज क्र.१४६०/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.२०/१२/२०२६

१. श्रीमती वत्सला गंगाराम पाटील
वय ७२ वर्ष, धंदा-गृहिणी
२. श्री. योगेश गंगाराम पाटील
वय- ४४ वर्ष, धंदा-शेती
३. श्री. संजय गंगाराम पाटील
वय-४५ वर्ष, धंदा-शेती
४. श्री. नवनाथ गंगाराम पाटिल
वय ४३ वर्ष, धंदा-शेती
५. श्रीमती. तृप्ती समीर मढवी
वय ३९ वर्ष, धंदा-गृहिणी
वरील अर्जदार क्र. १ ते ५ यांचा पत्ता
मु. वाघीवली वाडा, दत्त मंदिराजवळ, पो. पारगाव
ता. पनवेल, जि. रायगड, ४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्या अर्थी तमाम जनतेस जाहीरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र १ ते ५ यांचे वडील कै. गंगाराम गौवऱ्या पाटील हे दिनांक २२/०४/२०२४. रोजी मु. वाघीवली वाडा, पो. पारगाव, ता. पनवेल जि. रायगड, येथे त्यांच्या राहत्या घरात मयत पावले आहेत. प्रस्तुतचा अर्ज कै. गंगाराम गौवऱ्या पाटील यांच्या खालील वर्णनांकित मिळकतीत वारस असल्याबातचे मे न्यायालयाकडुन वारसदाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी दाखल केला आहे.

**मौजे : ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | युनिट केस क्र. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| ओवळे | २४२ | ११८ | ० | १-५६-१ |
| | | १२२ | १+२ | १-३४-६ |

अर्जदार यांना वारसदाखला प्रदान करण्याविषयी कोणाचेही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती लेखी स्वरूपात कागदपत्रांसह ही जाहीरनोटिस प्रसिध्द केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात मुदतीत हरकती न आल्यास अर्जदार यांना वारसदाखला प्रदान करण्यात येईल व मागाहुन येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

आज दि. ११ माहे १२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

उरण येथील मे दिवाणी न्यायाधीश साहेब क. स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.३२८/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०१/२०२६

अश्विनी अशोक सरवणकर व इतर — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. अशोक लक्ष्मण सरवणकर हे दिनांक ०५/०८/२०२५ रोजी मौजे तेरणा स्पेशालिटी हॉस्पीटल ॲण्ड रिर्सच सेंटर, नेरूळ, नवी मुंबई, ठाणे येथे मयत झाले आहेत. कै. अशोक लक्ष्मण सरवणकर हे कायमस्वरूपी रा. हाऊस नं. ८९२, झेड १४, भोवरा, सुंदर नगर, उरण मोरा रोड, ता. उरण, जि. रायगड येथे राहत होते. कै. अशोक लक्ष्मण सरवणकर यांची आई कै सरस्वती लक्ष्मण सरवणकर हया बऱ्याच वर्षा पुर्वी मयत झाल्या आहेत. कै. अशोक लक्ष्मण सरवणकर हयांचे अर्जदार क्र.१) अश्विनी अशोक सरवणकर, रा. हाऊस नं. ८९२, झेड १४, भोवरा, सुंदर नगर, उरण मोरा रोड, ता. उरण, जि. रायगड, २) श्री. प्रफुल्ल अशोक सरवणकर, रा. सुंदर नगर, कातकरी वाडी, भवरा, ता. उरण, जि. रायगड, ३) प्रज्ञा अशोक सरवणकर रा. हाऊस नं.८९२, झेड १४, भोवरा, सुंदर नगर, उरण मोरा रोड, ता. उरण, जि. रायगड हे कायदेशिर वारस आहेत.

सबब वर वर्णन केलेल्या अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वःत अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होउन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही, तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : उरण
दिनांक : १७/१२/२०२५

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण**

मा.पवार मॅडम कोर्ट

ॲड.माधुरी चतारे
८०९७३९०३००

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधीश (व/क स्तर), पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५९९/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०२/२०२६

१. श्रीमती मिनाक्षी रमेश शिंदे
वय ५७ वर्षे, धंदा नोकरी
२. श्री. ओमकार रमेश शिंदे
वय २७ वर्षे, धंदा नोकरी
३. कु. अभिप्रिती रमेश शिंदे
वय २५ वर्षे, धंदा नोकरी
सर्व राहणारः सी-५/१२/०:३, सेक्टर १८,
नविन पनवेल, (पु), जि. रायगड पिन ४१०२०६ — अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. रमेश राजाराम शिंदे हे दि. ०५/११/२०२१ रोजी एस.डी. एच. पनवेल, येथे मरण पावले आहेत व ज्याअर्थी सदर मयत कै. रमेश राजाराम शिंदे यांच्या मृत्युपश्चात त्यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

अ) सदनिका क्रं. सी-५/१२/०:३, नवजीवन अपार्टमेन्ट ओनर्स असोशिएशन, सेक्टर १८, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६, क्षेत्रफळ ३८.२८ चौ. मी. बिल्ट अप ही सदनिका आहे.

सदर सदनिका कै. रमेश राजाराम शिंदे व सदर अर्जातील अर्जदार क्रं. १ त्यांची पत्नी मिनाक्षी रमेश शिंदे यांनी त्यांचे दोघांचे संयुक्त नावाने दि. २५/०२/२००० रोजीचे कन्व्हेन्स डीड ऑफ अपार्टमेन्ट या कराराने श्री रमेश केशव उपाध्ये यांचेकडून खरेदी केली असून सदरचा डीड ऑफ अपार्टमेन्ट दिनांक २५/०२/२००० रोजी दस्त क्रं. ८३३ अन्वये नोंदविला आहे. कै. रमेश राजाराम शिंदे सदर सदनिकेचे संयुक्तपणे (निम्मे) मालक झाले आहेत.

ब) सदनिका क्रं. बी-१०४, पहिला मजला, बी विंग, पुष्प कलश को. ऑप. हौ. सो. लि., गट नं. ४५, हिस्सा नं. १४, शिल्लोत्तर रायचूर (सुकापूर), ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६, क्षेत्रफळ ६१.४ चौ. मी. कारपेट व टेरेस ४.४० चौ. मी.

सदर सदनिका कै. रमेश राजाराम शिंदे व त्यांची पत्नी सदर अर्जातील अर्जदार क्रं. १ मिनाक्षी रमेश शिंदे यांनी त्यांचे दोघांचे संयुक्त नावाने दि. २३/०९/२००८ रोजीचे ॲग्रीमेन्ट फॉर सेल या कराराने मे. हरिओम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांचेकडून खरेदी केली असून सदरचा ॲग्रीमेन्ट फॉर सेल हा दस्त मे. सह दुय्यम निबंधक, पनवेल यांचे कार्यालयात दिनांक २३/०९/२००८ रोजी दस्त क्रं. ७०८७/२००८ अन्वये नोंदविला आहे. सदर कै. रमेश राजाराम शिंदे सदर सदनिकेचे संयुक्तपणे (निम्मे) मालक झाले आहेत.

वरील परिच्छेद अ) तसेच परिच्छेद ब) मध्ये नमुद केलेल्या दोन्ही सदनिका मिळकतीतील कै. रमेश राजाराम शिंदे यांच्या हिश्याची मिळकत सदर अर्जदारांचे नावे होण्याकरिता ते कै. रमेश राजाराम शिंदे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला. मिळण्याकरिता या मे. कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरूर त्या कागदोपत्री पुराव्यानीशी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे. कोर्टात सादर करावी विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. १६ माहे १२ सन २०२५ रोजी व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

## जाहिर नोटीस

या नोटीसीव्दारे सर्व संबंधितांना कळविणेत येते की मुणोत रिजेन्सी को-ऑप होसिंग सोसायटी लि., सर्व्हे नं. ७४५, हिस्सा नं. २, तलाठी ट्रेनिंग सेंन्टर, साई नगर पनवेल, तालुका- पनवेल, जि. रायगड या संस्थेचे सभासद श्री. अशोक मनसुखलाल गुगले व श्री. राजेश मनसुखलाल गुगले यांनी संस्थे मधिल फ़्लॅट क्र. बी-४०१ हा धारण केलेला आहे. या संस्थेचे नोंदणी नंतर त्यांचे नांवे शेअर सर्टिफिकेट क्र. ३५ चे भाग क्र. ३४१ ते ३५० देणेत आलेले आहे. सदर शेअर सर्टिफिकेट श्री. अशोक मनसुखलाल गुगले व श्री. राजेश मनसुखलाल गुगले यांचे कडुन गहाळ झालेले असून त्यांनी दुसरी प्रत (डुप्लीकेट) मिळणे साठी अर्ज केलेला आहे. त्यांचे मागणी नुसार संस्थेने त्यांना डुप्लीकेट शेअर सर्टिफिकेट देणेस मान्यता दिलेली आहे. ते देणे पुर्वी श्री. अशोक मनसुखलाल गुगले व श्री. राजेश मनसुखलाल गुगले यांचे नांवे संस्थेने दिलेले शेअर सर्टिफ़िकेट त्यांनी अन्य कोणास तारण / गहाण, बक्षिस अथवा खरेदी / विक्री इत्यादी प्रकारे देण्यात आलेले असल्यास अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क प्रस्तापित होत असल्यास संस्थेच्या खालिल पत्यावर पदाधिकारी यांचे नावे त्यांना पोहोच होईल अशा कोणत्याही मार्गाने हि नोटीस प्रसिध्द झाल्या पासून १५ (पंधरा) दिवसांचे आंत लेखी कागदोपत्री पुराव्यासह सादर करणे. या मुदतीत कोणाकडून ही हरकती प्राप्त न झाल्यास डुप्लीकेट शेअर सर्टिफ़िकेट दिले जाईल याची नोंद घ्यावी. व त्या नंतर होणाऱ्या परिणामांची संस्थेवर जबाबदारी राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/१२/२०२५

सही/-
**(श्री.विनोद बिंद्रा)**
**खजिनदार**
**मुणोत रिजेन्सी को-ऑप हौसिंग सोसायटी लि.,**
**सर्व्हे नं. ७४५, हिस्सा नं. २, तलाठी ट्रेनिंग सेंन्टर,**
**साई नगर पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड**
**मोबाईल क्र. ९८२०८९८५७९**

मा. साळवी मॅडम कोर्ट

ॲड. अजित धनराज म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५६०/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०१/२०२६

१. श्री. पराग बबनराव राणे
वय - ६४ वर्षे, धंदा शेती
राहणार-फ्लॅट नं. २ आदी नारायण सोसायटी
नाईक व डी आरे रोड, विश्वकृपा हॉस्पिटलच्या
जवळ गोरेगाव (प) मुंबई.
२. श्री. मिलिंद बबनराव राणे
वय - ५९ वर्षे, धंदा शेती
राहणार - ए १२०२, प्रकृती कृष्णवाटिका रोड,
गोकुळधाम गोरेगाव (उ) मुंबई. ४०००६३
३. श्री. केतन बबनराव राणे
वय - ५२ वर्षे, धंदा शेती
राहणार-सी ४०४, वेलेन्टीन आपार्टमेंट ३,
को.ऑ.हौ.सो.लि. पिंपळपाडा, जनए.ए वैद्य मार्ग,
वेअरघिसे कंपाउंड समोर, — अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही — सामनेवाला

१. ज्याअर्थी कै. बबनराव पंडीत राणे हे दिनांक ०३/१२/२०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी फलॅट नं. २ आदी नारायण सोसायटी नाईक व डी आरे रोड, विश्वकृपा हॉस्पिटलच्या जवळ गोरेगाव (प) मुंबई येथे मयत झाले असून त्यांची पत्नि कै. अनुराधा बबनराव राणे हया देखील दिनांक २५/१०/१९९४ रोजी त्यांच्या राहत्या घरी फलॅट नं. २ आदी नारायण सोसायटी नाईक व डी आरे रोड, विश्वकृपा हॉस्पिटलच्या जवळ गोरेगाव (प) मुंबई. येथे मयत झालेल्या आहेत. त्याचप्रमाणे कै. बबनराव पंडीत राणे यांची आई कै रत्नप्रभा पंडीत राणे हया देखील फार वर्षांपूर्वी मयत झाल्या आसून अर्जदार यांना आजरोजी त्यांच्या मृत्यची तारीख माहीती नाही. कै. बबनराव पंडीत राणे यांना वर वंशावळीत नमूद दाखविल्याप्रमाणे अर्जदार नं. १ ते ३ हेच कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांच्याशिवाय कै. बबनराव पंडीत राणे यांस आणखीन कोणीही वारसदार नाहीत.

२. कै. बबनराव पंडीत राणे यांनी त्यांच्या हयातीमध्ये सामाईकरित्या मौजे तळोजे पाचनंद येथे काही मिळकती विकत घेतलेल्या होत्या. सदर मिळकतीवर कै. बबनराव पंडीत राणे व ईतर त्यांच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजे पाचनंद | १२४ | ५ अ | ०-१३-० |
| | १२४ | ५ ब | ०-३५-० |
| | १२४ | ५ क | ०-०८-० |

सदरच्या मिळकती हया नवीन मुंबई प्रकल्पाकरीता सिडकोने संपादित केल्या आहेत. सदर मिळकतीचा अवॉर्ड हा कै. बबनराव पंडीत राणे व ईतर यांच्याच नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर मिळकती मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भुखंड देण्यात आले आहे.

| नोड | सिडको संचिका क्र. | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| तळोजा | ५५+९०० | ७ | २४ | ५०० |

१. कै. बबनराव पंडीत राणे यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि. चौ. अर्ज पनवेल येथील मे. दिवाणी न्या. कनिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमुद केलेल्या मिळकतीस कै. बबनराव पंडीत राणे यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तकार ग्राहय धरली जाणार नाही.

आज तारीख १७/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल**

# पनवेलला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवणार : विक्रांत पाटील



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलला होत असलेल्या आंतरराष्ट्रीय नवी मुंबई विमानतळा प्रमाणेच पनवेल शहर सामाजिक,शैक्षणिक,भौगोलिक,सांस्कृतिक,औद्योगिक दृष्ट्या आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवणार असल्याचे सुतवाच विधान परिषदेतील आमदार विक्रांत पाटील यांनी पनवेल येथे घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केले आहे.तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरणाची बाब ही केंद्राच्या अधिपत्यात असून त्याचा पाठपुरावा निश्चित स्वरूपात महाराष्ट्र शासनाकडून सुरू आहे. त्यामुळे विमानतळाच्या नामकरणाला थोडा विलंब होऊ शकतो असेही यावेळी त्यांनी स्पष्ट केले आहे.

विधान परिषदेमधील आमदार विक्रांत पाटील यांनी त्यांच्या वर्षाभराच्या कालावधीत अर्थसंकल्प अधिवेशन पावसाळी अधिवेशन व हिवाळी अधिवेशन या कालावधीमध्ये केलेल्या लोकप्रमुख कामगिरीचा आढावा घेण्यासाठी पनवेल मधील पीस पार्क हॉटेलमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी आमदार विक्रांत पाटील यांच्यासह मा. कोकण म्हाडा सभापती बाळासाहेब पाटील , प्रदेश कार्यकारणी सदस्य सुभाष कदम ,प्रशांत कदम ,तानाजी खंडागळे हे होते . विक्रांत पाटील यांनी अधिवेशन कालावधील मधील तारांकित प्रश्न, लक्ष-वेधी, विशेष उल्लेख, अवचित्य मुद्दे, अल्पकालीन चर्चा व अर्धा तास चर्चा यामधील एकूण २५१ प्रश्न हे पनवेल तालुका व महानगर क्षेत्रातील समाजभिमुख व लोकांशी निगडित असलेले प्रश्न उपस्थित करून विकासात्मक निर्णय घेण्यात शास-नाला भाग पाडले आहे. जनतेच्या जिव्हाळ्या बाबत असणारे पाणी,रस्ते, वीज, नयना बाधित प्रकल्प, पनवेलच्या सर्वसामान्यांचा जिव्हाळ्याचा असलेला एसटी बस डेपोच्या विकासाचा प्रश्न,सिडकोशी संबंधित असणारे विविध अनेक वर्षापासून प्रलंबित प्रश्न हे त्यांनी विधान परिषदेमध्ये आपल्या झंजावाती कार्यकालात मांडून पनवेलकरांचा बुलंद आवाज हा विधान परिषदेमध्ये दाखवून दिला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना अनुसरून शासनाने ही त्वरित त्याबाबत अंमलबजावणी करून योग्य तो फायदेशीर निर्णय हा पनवेलकरांना मिळवून दिलेला आहे व त्यामध्ये १९८४ सालापासून असलेल्या सिडकोच्या परिवहन विभागात काम करत असलेल्या १६०० कर्मचाऱ्यांना थकीत वेतन मिळवून देण्याचा असो किंवा पनवेलकरांच्या पाण्याचा मूलभूत प्रश्न असो, शासनाने सुरू केलेला नैना प्रकल्प बाधित शेतकऱ्यांचा प्रश्न असो, पोलिसांच्या करता असलेल्या पनवेल मधील २२० खोल्यांचा प्रश्न असो, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विक्रीएशन सेंटर व अद्यावत ऑडिटोरियम उभारणे बाबत, मुंबई विद्यापीठाच्या मध्यवर्ती वाचनालयाच्या धर्तीवर एक अद्यावत लायब्ररी उभारण्याबाबत,सिडकोणे निर्माण केलेल्या गृह संकुलातील प्रश्न असो , महानगरपालिका क्षेत्रातील विजेच्या समस्या बाबतचा प्रश्न, सिडको वसाहती मधील रस्ते गटार रस्त्यावर नसलेल्या फुटपात समस्या बाबत, पनवेल शहर हे झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे बाबत, पनवेल परिसरातील सिडको बाधित गावठाण क्षेत्रांमध्ये गरजेपुरती बांधलेल्या वाढीव बांधकाम नियमित करणे बाबत,पनवेल मध्ये होत असलेल्या वायू प्रदूषणाबाबतव सिडको ने निर्माण केलेल्या घरांच्या किमतीमधील दर कमी करण्याचा प्रश्न असो हे जनतेशी अत्यंत जिव्हाळ्याची आणि आर्थिक बाबतीत विकास घडवणारे अनेक प्रश्न त्यांनी विधान परिषदेमध्ये मांडले. त्यामुळे शासनाला योग्य तो निर्णय घेण्यासही त्यांनी उद्युक्त केले आहे.पनवेलच्या सामाजिक, सांस्कृतिक,भौगोलिक, व्यावसायिक, औद्योगिक, शैक्षणिक बाबती मधील विविध जनतेशी मूलभूत असणाऱ्या प्रश्नांची योग्य ती माहिती घेऊन त्याचा सखोल अभ्यास करून त्याच्या संबंधित असणारे विविध प्रश्न त्यांनी आपल्या विधान परिषदेच्या एक वर्षाच्या कालावधीत मांडून शासनाचे लक्ष वेधले आहे.शासनाकडे त्याचा पाठपुरावाही केला आहे. त्यातूनच पनवेलकरांना भेडसावणाऱ्या पाण्याचा प्रश्न हा ही सुटलेला असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

सिडकोच्या परिवहन विभागामध्ये काम करत असलेल्या कामगारांना तब्बल १५७ कोटी रुपयांची देणी देण्यास सुरुवात झाली आहे.सिडको ने बांधलेल्या घरांच्या किमती ह्या दहा टक्क्याने कमी करण्यास त्यांनी सरकारला निर्णय घेणे भाग पडले आहे.त्याचाही परिणाम यांनी सिडकोची घरे घेतली आहेत त्यांच्या आर्थिक जडणघडणी वरती त्याचा मूलभूत परिणाम होणार आहे.पनवेलला आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनवण्यासाठी ज्या ज्या ठिकाणी रस्त्यांचे जाळे उभारणे आवश्यक आहे,जिथे जिथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे उद्यान उभारणे,वाहनांची होत असलेली कोंडी सोडवण्यासाठी उड्डाणपुलाची उभारणी करणे आवश्यक आहे, याबाबतही ते लवकरच प्रशासनाशी चर्चा करून त्याबाबतही शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.या पत्रकार परिषदेमध्ये विचारण्यात आलेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये नवी मुंबई विमानतळाचे नामकरण कधी व कसे होणार २५ डिसेंबरला नामकरण होणार की नाही याबाबत विचारले असता ते म्हणाले की विमानतळाचे नामकरण चा ठराव हा महाराष्ट्र शासनाने करून केंद्राकडे पाठवलेला आहे. नवी मुंबई विमानतळा प्रमाणेच अन्य विमानतळाचे नामकरणाचे प्रस्तावही केंद्रात गेलेले आहेत. याबाबत योग्य ति पूर्तता झाल्यानंतर योग्य वेळी नामकरणाचा निर्णय हा केंद्राकडून निश्चित घेतला जाईल. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाला थोडासा विलंब होऊ शकतो असे यावेळी त्यांनी स्पष्ट सांगितले आहे.

## माथेरान मधील न.प.च्या निवडणुकीत भाजप खाते खोलणार?

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील अल्प मतदार संख्या असणाऱ्या पक्षात भाजप सुध्दा येत असून या पक्षाची गावात जवळपास दोनशेच्या आसपास एकूण मतदार संख्या आहे. परंतु यावेळी शिवसेने सोबत महायुतीच्या माध्यमातून भाजपला पाच ठिकाणी उमेदवारी देण्यात आली आहे. यातील तीन उमेदवार हे माजी नगरसेवक आहेत.

वरिष्ठांच्या आदेशानुसार याठिकाणी शिवसेना भाजप महायुती करण्यात आली आहे. कारण आजवरच्या राजकीय इतिहासात इथे स्वबळावर कोणत्याही पक्षाला बहुमत सिध्द करता आलेले नाही. भाजपच्या पाचही उमेदवारांना निवडणूक लढविण्यासाठी चांगले प्रभाग मिळाले असून केवळ महायुतीच्या माध्यमातून यावेळी भाजपला नगरपरिषदेच्या सभागृहात जाण्यासाठी खाते उघडण्याची नामी संधी मिळाली आहे. त्याप्रमाणे या निवडणुकीत भाजपच्या कार्यकर्त्यांनी, उमेदवारांनी चांगल्या प्रकारे मेहनत घेतली असून एखाद दुसऱ्या प्रभागात चांगल्या मतांच्या फरकाने खाते खोलण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

## म्हसळा तालुक्यात १६ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार ; आरोपीस ठोकल्या बेड्या

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यात देवघर येथील एका सोळा वर्षीय मुलीला इंस्टाग्राम वर संपर्क साधून तिच्या घरापर्यंत पोचत मुरुड येथील आरोपी यांनी त्या मुलीला दम देत तिला फिरायला सोबत आली नाहीस तर तुझ्या आईला मारून टाकेन या भीतीपोटी त्या मुलीला तो फिरायला घेऊन गेला त्यावेळी ती नकार देत असताना त्यांनी माझ्यासोबत फिरायला आली नाहीस तर मी तुला देखील मारून टाकीन नंतर त्यांनी जबरदस्ती फिरायला घेऊन गेला त्यानंतर दुपारी चारच्या दरम्यान जंगलात जाऊन तिच्यावरती अत्याचार केला ही गोष्ट सायंकाळी तिच्या आईला समजतात आईने विचारला असता तीने ही सगळी हकीगत सांगितली त्वरित आई-वडिलांनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल करून पोलिसांनी आरोपीला दोन तासाच्या आत ताब्यात घेऊन त्याला बेडया टाकल्या . आरोपीवर पोस्को कायदा अंतर्गत ४,६, ८, १२ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४ नुसार गुन्हा दाखल करून पोलीस कस्टडी मागितली आहे

या प्रकरणी पोलीस अधीक्षक अंचल दलाल, उपविभागीय पोलिस अधिकारी सविता गर्जे, म्हसळा पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या सह त्यांच्या टीमने उत्कृष्ट कामगिरी करून शोशित कटुंबाला त्वरीत न्याय मिळवून दिल्याने तालुक्यात पोलिसांचे कौतुक केले जात आहे या घटनेचा तपास पोलिस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर एडवळे हे अधिक तपास करीत आहेत.

## मानव-बिबटया संघर्ष कमी करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

वन्य प्राण्यांचा हल्ला होवू नये, याकरिता नागरिकांना सतत जागरुक केले जात आहे. या सर्व उपाययोजना जिल्ह्यातील वन विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासन, संयुक्त वनव्यवस्थापन समित्या, महसूल, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत आणि स्थानिक नागरिक यांच्याशी समन्वय ठेवून, सहकार्याने प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. तरी या सर्व प्रक्रियेत मानव-बिबटया संघर्ष कमी करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी आज येथे केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात आयोजित रायगड जिल्ह्यातील बिबटयाचा वाढता उपद्रव व त्याबाबत करावयाच्या उपाययोजनांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल (दृरदूश्यप्रणालीद्वारे), उप वनसंरक्षक अलिबाग राहुल पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रियदर्शनी मोरे, उप वनसंरक्षक रोहा डॉ.शैलेंद्रकुमार जाधव हे उपस्थित होते. तर कांदळवन विभागाच्या विभागीय वनअधिकारी कांचन पवार या दृरदूश्यप्रणालीद्वारे उपस्थित होत्या.


मानव-बिबट्या संघर्ष कमी करण्यासाठी जिल्ह्यातील वन विभागांकडून विविध प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना राबविण्याबाबतच्या सूचना संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना देत जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, बिबट्याच्या उपस्थितीबाबत माहिती प्राप्त होताच विशेष बचाव पथकांची नियुक्ती करणे, पिंजरे उभारणे, संवेदनशील भागांत गस्त घालणे, जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे, शाळा व ग्रामस्तरावर मार्गदर्शन करणे, निरीक्षणासाठी ट्रॅप कॅमेराचा वापर करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी विशेष बचाव पथक कार्यरत ठेवणे आदि सूचनाही संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना श्री.जावळे यांनी दिल्या. मानव-वन्यजीव संघर्षप्रवण क्षेत्रांची ओळख, वर्गीकरण व नकाशीकरण करून, पगमार्क, नियमित गस्त व विशेष दक्षता याद्वारे निरीक्षण व माहिती संकलन करणे, संघर्षप्रवण गावांमध्ये सूचना फलक लावणे, लहान मुले, वृद्ध व महिलांच्या सुरक्षिततेबाबत विशेष सूचना देणे, जनजागृती व स्थानिक सहभाग वाढविण्यावर भर, ग्रामस्थांना सुरक्षित वर्तन, काळजी व प्रतिबंधात्मक उपायांबाबतचा सविस्तर आढावा त्यांनी यावेळी घेतला. सन-२००७ मधील महत्वाच्या तरतूदीनुसार मानव वन्यजीव संघर्षामुळे उद्भवणाऱ्या मानवी मृत्यू, गंभीर दुखापत, घरांचे नुकसान तसेच पिकांचे नुकसान या बाबींसाठी तात्काळ पंचनामा करुन नुकसान भरपाई देण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच मानव वन्यजीव संघर्ष प्रवणक्षेत्रामध्ये तातडीची कार्यवाही करण्यासाठी जलद प्रतिसाद पथके (आरआरटी) स्थापन करुन त्यासाठी आवश्यक साहित्याच्या मागणीकरिता तात्काळ प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. या बैठकीला विविध तालुक्यातील वनक्षेत्रपाल तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## शिवसेना उरण प्रभारी जिल्हाप्रमुखपदी विनोद सदाशिव साबळे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे (उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या प्रभारी जिल्हाप्रमुख पदी (कार्यक्षेत्र उरण विधानसभा) येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर नियुक्तीचा कालावधी एक वर्षाचा असेल. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण याचा आपण सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास शिवसेना सचिव संजय पुष्पलता भाऊराव मोरे यांनी नियुक्ती पत्र देताना व्यक्त केला आहे.



## लोकनेते रामशेठ ठाकूर शाळांमध्ये आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेचे पारितोषिक वितरण; २३ विद्यार्थ्यांचा गौरव




**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा २०२५ अंतर्गत आंतरशालेय फेरीचे पारितोषिक वितरण सोहळा लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल, कामोठे येथे उत्साहात पार पडले.या आंतरशालेय फेरीत विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी प्रभावी वक्तृत्व सादर केले होते. त्यामधून निवड झालेल्या एकूण २३ विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी सामाजिक, शैक्षणिक व समकालीन विषयांवर आत्मविश्वासाने विचार मांडून उपस्थितांची दाद मिळवली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक स्वप्नाली यांनी सांगितले, आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना विचार मांडण्याचे व्यासपीठ मिळते. अशा स्पर्धांमुळे आत्मविश्वास, संवादकौशल्य आणि नेतृत्वगुण विकसित होतात. कोशिश फाऊंडेशनने घेतलेला हा पुढाकार निश्चितच कौतुकास्पद आहे. तसेच हर्षवर्धन पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले कि, आज सन्मानित झालेले विद्यार्थी हे उद्याचे सक्षम वक्ते आणि जबाबदार नागरिक आ-हेत. या स्पर्धेमुळे मुलांमध्ये धाडसाने बोलण्याची क्षमता निर्माण होत असून, हेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. शाळा प्रशासनाने कोशिश फाऊंडेशन आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त करत, विद्यार्थ्यांना मिळणारे हे व्यासपीठ त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे नमूद केले. या आंतरशालेय फेरीतील यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील स्तरावर स्वतःची क्षमता सिद्ध करण्यासाठी मोठी प्रेरणा मिळाल्याचे वातावरणातून स्पष्ट झाले. यावेळी युवा मोर्चा कामोठे अध्यक्ष तेजस जाधव, मनोहर शिंगाडे, राहुल बुधे, अमित गोडसे यांच्यासह शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

## डोळ्यात मिरची पावडर टाकल्याने तरुणी विरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३२ वर्षीय तरुणाच्या डोळ्यात मिरची पावडर टाकल्याने तरुणी विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

३२ वर्षीय तरुण तक्का येथे राहत असून २०२० मध्ये त्याची ओळख एका तरुणी सोबत झाली आणि त्याचे रूपांतर प्रेम संबंधात झाले. त्यांचेत वाद होत असल्याने २०२३ मध्ये तरुणीने ३२ वर्षीय तरुणा वर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात तरुण जामीनावर आहे. पनवेल रेल्वे स्टेशनला तो बहिणीला घेण्यासाठी मोटरसायकलवर जात होता.

यावेळी पनवेल रेल्वे स्टेशनला बस डेपोच्या मागे पाण्याच्या टाकीजवळ पोहोचला असता सदरची तरुणी आणि तिचे वडील व भाऊ हे आले आणि त्या तरुणीने त्याच्या डोळ्यात आणि तोंडावर मिरची पावडर टाकली. डोळ्यात मिरची पावडर गेल्याने काही दिसेनासे झाले. त्यानंतर तो पोलीस स्टेशनला आला आणि पोलिसांनी त्याला उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे उपचार करून पोलीस स्टेशनमध्ये आणले.

## राष्ट्रीय लोक अदालतीत ९ हजार ५८८ प्रकरणे निकाली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा निपटारा व्हा-वा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने आयोजित केलेल्या १३ डिसेंबर २०२५ रोजी पनवेल येथील न्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व आणि दाखल अशी एकूण ९ हजार ५८८ प्रकरणे सामंजस्याने मिटवण्यात यश आले आहे. अशी माहिती शैलेश उगले, जिल्हा न्यायाधीश १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, पनवेल, रायगड यांनी दिली.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.



त्यामध्ये न्यायालयीन प्रलंबित प्रकरणे तसेच महावितरण, बँक, फायनान्स, पतपेढी संस्था अशा विविध विभागांकडून आलेली वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. पनवेल येथील जिल्हा न्यायालयात आयोजित केल्या गेलेल्या लोक अदालतीमध्ये वादपुर्व व प्रलंबित अशी एकूण ४७ हजार ३३६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. ३८ हजार ८३१ वादपूर्व प्रकरणा पैकी ५ हजार २२९ आणि ८ हजार ५२३ प्रलंबित खटल्यांपैकी ४ हजार ३५९ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोक अदालतीमध्ये निकाली काढण्यात आली. व त्याद्वारे पक्षकारांना आणि विविध विभागांना एकूण ४५ कोटी ७८ लाख ८८ हजार ५३५ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष आणि संपूर्ण कार्यकारणी मंडळ यांचे विशेष सहकार्य मिळाले. पनवेल येथील न्यायालयात लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. यासाठी कक्ष प्रमुख म्हणून दि. ए. कोठलीकर, जिल्हा न्यायाधीश - २ व अति. सत्र न्यायाधीश, पनवेल, न्यायाधीश आर. एम. गणविर, न्यायाधीश ए. एस. बडगुजर, न्यायाधीश एस. वाय. राणे, न्यायाधीश एम.डी. सैंदाणे, न्यायाधीश एम. व्ही. साळवी या न्यायाधीशांनी काम पाहिले. तसेच पंच म्हणून ॲड. इंद्रजीत भोसले, ॲड. प्रशांत गवाणे, ॲड.दिपाली बोहरा, ॲड. मनीषा गावंडे, ॲड. साहिल मोरे, ॲड. पौर्णिमा सुतार यांनी काम पाहिले.

लोक अदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून देखील प्रकरणे मिटवण्यात आली. या लोकन्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग , न्यायालयीन कर्मचारी दिपाली म्हात्रे, सहा.अधीक्षक - जिल्हा न्यायालय, हेमंत आंबेतकर, वरिष्ठ लिपिक जिल्हा न्यायालय, पनवेल, न्यायालयीन कर्मचारी, आणि शैलेश कोंडसकर समवेत, समीक्षा कडू, निकिता खरात आणि विजया चव्हाण या विधी स्वयंसेवकांनी, महानगरपालिका, बँक, पोलीस प्रशासन, इतर शासकीय विभाग आणि सर्व पक्षकार यांनी प्रतिसाद दिला. शैलेश उगले, जिल्हा न्यायाधीश १ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती पनवेल रायगड यांनी सर्वांचे आभार मानले.